**ठळक बातम्या**

- राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर, गृहनिर्माण क्षेत्रात ७० हजार कोटींची गुंतवणूक करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय

- दोन दिवसीय स्टार्टअप कॉन्क्लेव्हचं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन

- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

- गडचिरोली इथं पाच जहाल महिला नक्षलवादी पोलिसांच्या ताब्यात

- ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर कालवश

**आणि**

- अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर श्रीनिवासन यांचं निधन

**<><><><><>**

राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण आज जाहीर झालं असून त्यासाठी ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. 'माझे घर माझा अधिकार' या ब्रीदवाक्यासह हा कार्यक्रम राबवताना अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्या विशिष्ट गरजांचा धोरणात विचार केला आहे. याशिवाय, महानगर गॅस लिमिटेडला  कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मुंबईत देवनार इथला भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला, तसंच, वाशिम जिल्ह्यात कारंजा इथं दिवाणी न्यायालय स्थापन करण्यासाठी १ कोटी ७६ लाखांच्या खर्चाला मंजुरी मिळाली आहे. धुळे जिल्ह्यात शिंदखेडा इथल्या, रायगड जिल्ह्यात पोशीर तसंच शिलार

प्रकल्पाच्या आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात वैभववाडी इथल्या सिंचन प्रकल्पाच्या वाढीव खर्चाला देखील मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली आहे.

<><><><>

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय स्टार्टअप कॉन्क्लेव्हला आजपासून मुंबईत सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन झालं. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. या परिषदेत ८०० पेक्षा जास्त प्रतिनिधी, वैज्ञानिक, ७० पेक्षा जास्त स्टार्टअप्स, औद्योगिक भागीदार, गुंतवणूकदार, शैक्षणिक संस्था आणि सरकारी यंत्रणांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. स्टार्टअप्स, गुंतवणूकदार आणि शासकीय प्रतिनिधींमधे संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने या परिषदेत विशेष संवाद आणि चर्चासत्रांचंही आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. मुंबईत राजभवन इथं झालेल्या या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळात मोठा ओबीसी नेता असावा यासाठी भुजबळ यांचा शपथविधी झाल्याचं सांगितलं जात आहे. त्यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा खात्याचा पदभार दिला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

<><><><>

अनेक हिंसक कारवायांमधे सहभागी असलेल्या पाच महिला नक्षलवाद्यांना पोलीस आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी आज गडचिरोली इथून ताब्यात घेतलं.

यातल्या तिघींना अटक करण्यात आली असून दोघी अल्पवयीन असल्यानं त्यांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात येणार आहे. या नक्षलवाद्यांवर एकूण ३६ लाख रुपयांचं इनाम होतं. उंगी मंगरू होयाम उर्फ सुमली, पल्लवी केसा मिडियम उर्फ बंडी आणि देवे कोसा पोडियाम उर्फ सविता अशी अटक केलेल्या नक्षलवाद्यांची नावं आहेत.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. पंजाबमधल्या अमृतसर इथं आज भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते तरुण चुग यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या आणि राष्ट्रगीत गायन करण्यात आलं. देशाच्या एकतेचं प्रतीक म्हणून १०० फूट लांबीचा तिरंगा घेऊन समाजतल्या सर्व स्तरातले नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. **सातारा** शहरातही आज तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं. या तिरंगा रॅलीत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, माजी सैनिक तसंच नागरिक सहभागी झाले होते. तिरंगा यात्रेबद्दल मुंबईतल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या…

**होल्ड…. बाईट**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्वारे येत्या २५ मे रोजी देशविदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२२ वा भाग असेल. श्रोते या कार्यक्रमासाठी सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकता. तसंच नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिक जयंत नारळीकर यांचं आज पहाटे पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. त्यांना भारत सरकारने पद्मभूषण तसंच पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरवलं होतं. ब्रिटनमधल्या केंब्रिज इथून डॉक्टरेट आणि रँग्लर या प्रतिष्ठित पदव्या घेतल्यानंतर त्यांनी १९७२ मध्ये मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्थेत खगोलशास्त्र विभाग प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली.  फ्रेड हॉयल यांच्यासह त्यांनी मांडलेला हॉयल-नारळीकर सिद्धांत प्रसिद्ध आहे. पुण्यात आयुका या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्यासाठी ‘पोस्टकार्डाद्वारे विज्ञान’ सारख्या अभिनव कल्पना राबवल्या. विज्ञानकथांबरोबरच त्यांनी विज्ञानावर विपुल लिखाण केलं. त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जयंत नारळीकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. खगोल भौतिकीतलं त्यांचं महत्वाचं सैधांतिक काम येत्या पिढ्यांसाठी मूल्यवान आहे, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ जयंत नारळीकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ‘नारळीकर यांच्या निधनामुळे राज्याने एक महान विज्ञान तपस्वी गमावला आहे’, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे. ‘भारतात खगोलशास्त्राचा भक्कम पाया घालण्यात नारळीकर यांनी अमूल्य योगदान दिलं, आंतरराष्ट्रीय स्तरावर खगोलीय संशोधनात मोलाची भर घातली’, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नारळीकर यांना आदरांजली वाहिली. ‘नारळीकर यांच्या निधनाने ज्ञान-विज्ञानाच्या प्रसारासाठी वाहून घेतलेला तेजस्वी तारा निखळला आहे’, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नारळीकर यांना आदरांजली वाहिली आहे.

'नारळीकरांचं निधन ही राज्याची आणि देशाची मोठी हानी आहे', अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नारळीकरांना आदरांजली वाहिली.

<><><><>

प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम आर श्रीनिवासन यांचं आज तामिळनाडूमधे निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. डॉक्टर श्रीनिवासन यांना भारताच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार म्हणून ओळखलं जातं. अणुऊर्जा विभागात सप्टेंबर १९५५ ला त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. भारताची पहिली अणुभट्टी अप्सरा च्या निर्मितीत डॉक्टर होमी भाभा यांच्यासोबत श्रीनिवासन यांचा सहभाग होता. १९५९ ला देशातल्या पहिल्या अणुऊर्जा केंद्रासाठी मुख्य प्रकल्प अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. श्रीनिवासन यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांमधे झपाट्याने वाढ झाली. देशातल्या महत्त्वाच्या ऊर्जा प्रकल्पांच्या निर्मितीत त्यांचं मोठं योगदान होतं. श्रीनिवासन यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी श्रीनिवासन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. श्रीनिवासन यांनी भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रातली पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यामुळे भारताचे ऊर्जा क्षेत्र आत्मनिर्भर व्हायला मदत झाली, असं प्रधानमंत्री आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे म्हणाले.

<><><><>

वक्फ दुरुस्ती कायदा २०२५ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. न्यायालयाद्वारे, वापरकर्त्याद्वारे अथवा कराराद्वारे एखादी मालमत्ता वक्फ नसल्याचं सिद्ध

करण्याच्या तरतुदीबद्दल अंतरिम आदेश देणं, राज्य वक्फ मंडळ आणि केंद्रीय वक्फ मंडळात मुस्लिमेतर सदस्यांना प्रवेश देण्याची तरतूद आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीनंतर एखादी मालमत्ता सरकारची असल्याचं सिद्ध झाल्यास ती वक्फ मानली जाणार नाही, या तरतुदींवर याचिकाकर्त्यांना असलेल्या आक्षेपावर ही सुनावणी घेतली जाणार आहे.

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी कालपासून पावसाने हजेरी लावली. रत्नागिरी जिल्ह्यात आज बऱ्याचशा ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडला.

नाशिक जिल्ह्यालाही काल पावसाने झोडपून काढले. या पावसाने शेतमालाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. वीज कोसळून निफाड तालुक्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला तर नाशिक तालुक्यात एक मुलगा जखमी झाला. तर चांदवड तालुक्यात विजांच्या कडकडाटाने पोल्ट्रीफार्ममधल्या सुमारे दोन हजार कोंबड्या दगावल्या. नाशिक शहरात बहुतांश ठिकाणी काल संध्याकाळी पाऊस झाला.

**//<><><><><>//**